मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | शुक्रवार, दि. 21 जून 2024 | पान- 1

# शहरात 13 ठिकाणी आंतरराष्ट्रीय योग दिन

## पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाचा पुढाकार : शहरवासीयांना सहभागी होण्याचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शहरातील विविध भागात १३ ठिकाणी योगा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, २१ जून रोजी सकाळी ६.३० वाजता शहरातील विविध बॅडमिंटन हॉल येथे नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून योग दिन उत्साहात साजरा करावा, असे आवाहन आयुक्त राहुल महिवाल यांनी केले आहे.



२१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन संपूर्ण जगभर साजरा करण्यात येतो. त्यानुसार पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने विविध भागात क्षेत्रीय कार्यालयनिहाय योगा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये “अ” क्षेत्रीय कार्यालयाच्या परिसरात निगडी प्राधिकरण येथे मदनलाल धिंग्रा मैदान बॅडमिंटन हॉल आणि नेताजी सुभाषचंद्र बोस बॅडमिंटन कोर्ट येथे योगा कार्यक्रमाचे अयोजन करण्यात आले आहे.

“ब” क्षेत्रीय कार्यालयाच्या परिसरात चिंचवड येथील फत्तेचंद जैन स्कुल शेजारील पवनानगर बॅडमिंटन हॉल आणि पागे तालीम समोरील विठोबा गावडे सभागृह येथे योगा कार्यक्रम साजरा करण्यात येणार आहे.

“ई” क्षेत्रीय कार्यालयाच्या क्षेत्रात भोसरीतील आदर्श शाळेजवळील दिघी रोड परिसरातील बॅडमिंटन हॉल आणि गव्हाणे वस्ती बॅडमिंटन हॉल येथे योगा कार्यक्रमाचे अयोजन करण्यात आले आहे.

“फ” क्षेत्रीय कार्यालयाच्या परिसरात चिंचवड मधील कृष्णानगर येथील स्वामी विवेकानंद क्रीडा संकुल, निगडीतील यमुनानगर येथील छत्रपती शिवाजी महाराज बॅडमिंटन हॉल येथे योगा कार्यक्रमाचे अयोजन करण्यात आले आहे.

“ग” क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत पिंपरीगाव येथील कापसे आळीतील काशिबा शिंदे बॅडमिंटन कोर्ट आणि थेरगाव येथील डांगे चौकातील मथाबाई डांगे बॅडमिंटन हॉल या ठिकाणी योगा कार्यक्रम साजरा करण्यात येणार आहे.

“ह” क्षेत्रीय कार्यालयाच्या परिसरात संत तुकारामनगर येथील संत तुकाराम पुतळ्यासमोरील सरदार वल्लभभाई पटेल बॅडमिंटन हॉल, पिंपळे गुरव येथील काटेपुरम चौकातील कै. काळूराम जगताप बॅडमिंटन हॉल आणि नवी सांगवी येथील पी. डब्ल्यू. डी. मैदानातील नवी सांगवी बॅडमिंटन कोर्ट येथे योगा कार्यक्रमाचे अयोजन करण्यात आले आहे.

### योग दिन उत्साहात साजरा करा

**» महापालिका आणि योग विद्या धाम संस्था, पिंपरी यांच्या सहकार्याने ‘आंतरराष्ट्रीय योग दिन २०२४’ International Yoga Day 2024 हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात नागरिकांनी सहभागी होऊन योग दिन उत्साहात साजरा करावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने केले आहे.**

# ‘नागरिकांनो..कर सवलतींचा लाभ घ्या’

## पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयातील पोलीस शिपाई यांच्या 262 रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया सुरु

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या विविध कर सवलतींचा लाभ घेण्यासाठी ३० जूनपर्यंत मुदत आहे. शहरवासियांसाठी केवळ १२ दिवस बाकी आहेत. कॅश काऊंटर १८ जूनपासून सकाळी पावणेदहा ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत सुरू राहणार आहेत. कर सवलतींचा जास्तीत-जास्त मालमत्ताधारकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करसंकलन विभागाकडून केले आहे.



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने सिध्दी उपक्रमाअंतर्गत महिला बचत गटामार्फत मालमत्ताधारकांना बिलांचे वेळेत वाटप करण्यात आले आहे. त्यामुळेच २०२४-२०२५ या आर्थिक वर्षातील अडीच महिन्यांत ३ लाख ९ हजार २३३ मालमत्ताधारकांनी ३६२ कोटी १२ लाख रुपयांचा महसूल महापालिका तिजोरीत जमा झाला आहे. कर संकलन विभागाच्या वतीने मालमत्ताधारकांना विविध कर सवलती देण्यात येत असून या सवलतींची ३० जून मुदत आहे. त्यामुळे आर्थिक वर्षातील पहिल्या तिमाहीत कर भरण्याकडे मालमत्ताधारकांचा कल असतो.

महापालिकेच्या वतीने कर संकलनासाठी १७ झोन आहेत. तसेच ऑनलाईनही सुविधा उपलब्ध आहे. मात्र, अनेक नागरिक रोखीने कर भरत आहेत. त्यामुळे कर संकलन कार्यालयात गेल्या काही दिवसांपासून नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. महापालिकेने सकाळी पावणेदहा ते सायंकाळी ६ या वेळेत कॅश काऊंटर सुरू ठेवण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. तसेच कर सवलतींचा लाभ घेण्यासाठी ३० जूनपर्यंत जास्तीत-जास्त मालमत्ताधारकांनी आपल्या कराचा भरणा करावा, असे आवाहन करसंकलन अधिकाऱ्यांकडून केले.

### अडीच महिन्यांत पन्नास टक्के मालमत्ताधारकांनी भरला कर

**» शहरातील मालमत्ताधारकांनी वेळेवर कर भरावा, यासाठी महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने विविध माध्यमातून मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात आली. कर थकीत ठेवल्यास त्यावर दंडाची रक्कम वाढतच जाते, त्यामुळे वेळेत कर भरणे कधीही मालमत्ताधारकांच्या हिताचेच असल्याचे पटवून देण्यात महापालिका प्रशासन यशस्वी झाले आहे. त्यामुळे आर्थिक वर्षाच्या पहिल्या अडीच महिन्यात ६ लाख २८ हजार मालमत्ताधारकांपैकी ३ लाख ९ हजार २३३ मालमत्ताधारकांनी कर भरणा केला आहे.**

# हिंजवडी आयटी पार्क समस्यामुक्त होणार!

## हिंजवडी परिसरात उद्योगसुलभ वातावरणासाठी पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांना गती द्यावी : अजित पवार यांचे निर्देश

**पुणे | प्रतिनिधी**

जागतिक दर्जाचे माहिती तंत्रज्ञान (आयटी) केंद्र अशी ओळख असणाऱ्या हिंजवडीतील राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान परिसरातील वाहतूक कोंडीची समस्या दूर करण्यासह या परिसरात नवीन उद्योग येण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने कराव्यात. या परिसरातील रस्त्यांचे रुंदीकरण, उड्डाणपूल, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प यासारख्या पायाभूत सुविधा पूर्ण कराव्यात, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बुधवारी वरिष्ठ अधिकाऱ्यांना मंत्रालयात आयोजित बैठकीत दिले.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हिंजवडी औद्योगिक संघटनेच्या मागण्यांबाबत बुधवारी बैठक घेतली. ते म्हणाले की, हिंजवडी, माण, मारुंजी गावच्या हद्दीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) माध्यमातून तीन टप्प्यांमध्ये राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान विकसित करण्यात आले आहे. येथील कंपन्यांना पूरक वातावरण देण्यास राज्य सरकारने प्राधान्य दिले आहे. त्यामुळे सर्व शासकीय यंत्रणांनी उद्योजकांना भेडसावणाऱ्या अडचणींचे समन्वयाने आणि तातडीने निराकरण करावे. उद्योग, नोकरीनिमित्त हिंजवडीत येणाऱ्या वाहनांची संख्या मोठी आहे. त्या तुलनेत याठिकाणचे रस्ते अरुंद असल्याने वाहतूक कोंडी होत आहे. ही समस्या दूर करण्यासाठी तातडीने पावले उचलावीत.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आपल्या हद्दीतील घनकचरा व्यवस्थापनासाठी १० टन क्षमतेचा प्रकल्प उभारत आहे. मात्र, एमआयडीसी परिसरालगतच्या ग्रामपंचायत हद्दीतील घनकचऱ्यावर प्रक्रिया होणे आवश्यक आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी १०० टन क्षमतेचा प्रकल्प उभारण्यासाठी आवश्यक कार्यवाही सुरु करावी. एमआयडीसी हद्दीत कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलीस चौकी उभारावी. यासाठी हिंजवडी औद्योगिक संघटनेने सहकार्य करावे, अशा सूचनाही उपमुख्यमंत्री पवार यांनी केल्या.

बैठकीस वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव आशीष शर्मा, उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असीमकुमार गुप्ता, पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) आयुक्त व मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल महिवाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव सदाशिव साळुंखे, उद्योग विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विपीन शर्मा आदी अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत हिंजवडी औद्योगिक संघटनेचे कॅप्टन चरणजित भोगल आणि सचिव लेफ्टनन्ट कर्नल (निवृत्त) योगेश जोशी आदी दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

### कोंडी टाळण्यासाठी उपमुख्यमंत्र्यांचे निर्देश

- हिंजवडीतील रस्ते रुंद करावेत.
- सर्वच रस्त्यांवर सहा मार्गिका ठेवाव्यात.
- आवश्यक ठिकाणी उड्डाणपूल उभारावेत.
- सेवा रस्त्यांची रुंदी वाढवावी.
- रस्त्यांवरील खड्डे भरावेत.
- दुभाजक आणि पदपथांच्या दुरुस्तीची कामे तत्काळ मार्गी लावावीत.
- पावसाच्या पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था उभारावी.

> हिंजवडी परिसराचा वेगाने विकास करण्यासाठी या परिसरात पायाभूत सुविधांची गतीने उभारणी करणे गरजेचे आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणांच्या प्रमुखांनी विभागीय आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली येत्या शुक्रवारी आणि शनिवारी या भागाची पाहणी करून आवश्यक उपाययोजना करण्याची पावले उचलावीत.
>
> **- अजित पवार, उपमुख्यमंत्री.**

# ..तर सहा महिन्यांसाठी गाड्या जप्त करा

## पायी गस्त घाला, वचक ठेवा : पोलीस आयुक्त वाहतूक शाखेच्या अधिकाऱ्यांवर कडाडले

**पुणे | प्रतिनिधी**

शहराच्या हडसपर, रामटेकडी, वानवडी, भैरोबा नाला परिसर, रास्ता पेठ, बिबवेवाडी भारती विद्यापीठ, पद्मावती आदी भागात जुन्या चारचाकी व दुचाकी वाहनांच्या विक्रीचे पेव फुटले आहे. थेट पदपथावरच या चारचाकी व दुचाकी गाड्या लावून 'फॉर सेल' असे फलक लावत पदपथ अडवले जात आहेत. त्यामुळे पादचाऱ्यांना रस्त्यावरून चालत जावे लागते. अनेकदा वाहनांची धडक बसल्याने किरकोळ तसेच गंभीर अपघात घडतात. याची दखल पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी घेतली असून याविषयी कारवाई करण्याचे आदेश वाहतूक निरीक्षकांना दिले आहेत. जर, कोणी ऐकत नसेल तर त्याच्या गाड्या सहा महिन्यांसाठी ताब्यात घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच, केवळ वाहनांमधून फिरण्यापेक्षा पायी गस्त घालण्याबाबत देखील त्यांनी अधिकाऱ्यांना खडसावले.



आयुक्त अमितेश कुमार हे सध्या विविध पोलीस ठाण्यांना भेट देऊन पाहणी करीत आहेत. तीन महिन्यापासून एक मुलगा बेपत्ता आहे. त्याच्या तपासाच्या अनुषंगाने त्यांनी बुधवारी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याला भेट दिली. त्यावेळी आयुक्तांनी भारती विद्यापीठ परिसरात पायी फिरून पाहणी केली. काही नागरिकांशी संवाद साधत समस्या जाणून घेतल्या. त्यानंतर ते सहकारनगर परिसरात असल्या पद्मावती येथे आले. त्यावेळी त्यांना पदपथावर महागड्या आलीशान गाड्या उभ्या असल्याचे निदर्शनास आले. या गाड्यांवर 'फॉर सेल' असे बोर्ड लावलेले होते. थेट पदपथावर गाड्या उभ्या करून गाड्या विक्रीचा बाजार भरलेला त्यांच्या निदर्शनास आला. पादचार्यांना चालण्यासाठी रस्ताच शिल्लक नव्हता. अवैध पार्किंग करण्यात आल्याचे लक्षात येताच आयुक्तांनी तत्काळ वाहतूक विभागाच्या प्रभारी अधिकार्यां ना बोलावून घेत, याबाबतचा जाब विचारला. 'तुम्ही तुमच्या हद्दीत काही पाहता की नाही?' असा जाब त्यांनी विचारला. अधिकाऱ्यांना खडे बोल सुनावत या गाड्या जप्त करून सहा महिने सोडू नका अशा सूचना केल्या.

यासोबतच शहरातील वाहतूक विभागाचे सर्व निरीक्षक, प्रभारी अधिकारी, तसेच सर्व पोलीस ठाण्यांचे निरीक्षक यांना आपापल्या हद्दीत पायी गस्त घालण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत. दररोज किमान पाच ते सहा किलोमीटर पायी गस्त घालण्यात यावी. नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घ्या. नागरिकांना न्याय देण्याबाबत जागरूक रहा अशा सूचना त्यांनी केल्या. पोलीस रस्त्यावर दिसले तर नागरिकांमध्ये सुरक्षेची भावना निर्माण होईल तसेच गुन्ह्यांचे आणि गैरप्रकारांचे प्रमाण कमी होईल असे आयुक्त म्हणाले.

अनेक ठिकाणी हॉटेल चालक 'वॅलेट पार्किंग'च नावाखाली पदपथावर किंवा रस्त्याच्या कडेला ग्राहकांच्या गाड्या लावतात. मध्यवस्तीम अनेक हॉटेल चालकांनी देखील गल्लीबोळातील रस्त्यावर दुतर्फा गाड्या लावण्यास सुरुवात केली आहे. स्थानिक नागरिक, खरेदीसाठी बाहेर पडलेले ग्राहक, पादचारी यांना अडचणींचा सामना करावा लागतो. वाहतूक पोलिसांकडून याकडे 'अर्थपूर्ण' दुर्लक्ष केले जाते.

पोलीस चौकीमध्ये नागरिक तक्रार अगर समस्या घेऊन गेल्यास त्यांची समस्या कशी सोडवता येईल याचा विचार न करता पैसे कसे मिळतील याचा चौकीस्तरावर अधिक विचार केला जातो. त्यामुळे अनेकदा लोकांना विनाकारण त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे पोलीस चौक्यांचे सक्षमीकरण केले जाणे आवश्यक आहे. पोलीस चौकी स्तरावरील अधिकाऱ्यांच्या देखील जबाबदाऱ्या निश्चित केल्या जाणार आहेत. चौकी स्तरावर देखील गुन्हेगारांवर वचक आवश्यक असल्याचे पोलीस आयुक्त म्हणाले.

# पालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे काम प्रगतीपथावर

## इमारत पर्यावरणपूरक, सौर उर्जेचा वापर, पाण्याचा पुनर्वापर : 36 महिन्यांत काम पुर्ण होणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे काम २० टक्के झाले आहे. सदरील इमारत ३६ महिन्यांत पुर्ण होणार आहे. ही इमारत पर्यावरणपूरक असून त्यात सौर उर्जेचा वापर, पाण्याचा पुर्नवापर करण्यात आला आहे. इमारत पुर्ण झाल्यानंतर नागरीकांना महापालिकेची सर्व विभागाची कार्यालये एकाच ठिकाणी उपलब्ध होणार असून पालिकेच्या कामाकाजात सुसुत्रता येणार आहे.





महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजासाठी नवीन इमारत बांधण्यात येत आहे. चिंचवड, ऑटो क्लस्टरसमोरील आरक्षण क्रमांक १८१ या ८.६५ एकराच्या भूखंडावर १३ मजली प्रशासकीय इमारत उभारण्यात येत आहे. त्यासाठी केएमव्ही प्रोजेक्ट, हैदराबाद हे ठेकेदार काम करत असून त्यांना कामाचा आदेश जानेवारी २०२३ मध्ये देण्यात आला. इमारत कामाची मुदत ३६ महिने आहे. तर इमारत बांधकामासाठी स्वीकृत निविदा रू.२८६.६३ कोटी इतकी आहे. तर कामाचे सल्लागार म्हणून सुनिल पाटील असोसिएट प्रा.ली. हे आहेत. केएमव्ही प्रोजेक्ट लिमिटेड हैद्राबाद या ठेकेदाराने रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून ८.१९ टक्के कमी म्हणजे २८६ कोटी रुपयांची निविदा सादर केली होती. संबंधित ठेकेदार मुदतीमध्ये काम करण्यास सक्षम असून केएमव्ही प्रोजेक्ट लिमिटेड या ठेकेदाराकडून रॉयल्टी, मटेरियल टेस्टींग चार्जेसह दोनशे कोटी ६३ लाख रुपयांत काम करुन घेण्यात येणार आहे.

तसेच सदर इमारतीमध्ये महापालिका सर्वसाधारण सभागृह, सुसज्ज असे ग्रंथालय, प्रदर्शन दालन, बहु उद्देशीय सभागृह,नागरिक व कर्मचारी यांचे आरोग्य तपासणीसाठी क्लिनिक, एटीएम सेंटर, ई-गव्हर्नन्स, नागरी सुविधा केंद्र, सुरक्षा कक्ष, कोर्टयार्ड, स्वच्छतागृह, स्वागत आणि माहिती कक्ष, कॅन्टीन व पत्रकार कक्ष इ. बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर इमारतीची रचना पर्यावरणपूरक, असून त्यामध्ये जलपुनर्भरण, सौर उर्जेचा वापर, पाण्याचा पुर्नवापर, स्कायलाइट, दोन व चार चाकी मिळून सुमारे ५ हजार वाहने पार्किंग आदी समावेश केलेला आहे. प्रशासकीय इमारतीची उंची ८३ मी. एवढी आहे. इमारत पुर्ण झाल्यानंतर नागरीकांना महानगरपालिकेची सर्व विभागाची कार्यालये एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. दरम्यान, सध्याची महापालिकेची इमारत अपुरी पडत आहे. अनेक विभागांची कार्यालये इतर इमारतींमध्ये स्थलांतरित केली आहेत. त्यामुळे तीन वर्षात नवीन प्रशासकीय इमारतीचे काम पुर्ण करण्यात येणार आहे.

### नवीन इमारतीत चार असणार विंग

चिंचवड येथील महानगरपालिकेच्या आरक्षण क्र.१८१ ड या जागेवर नवीन प्रशासकीय इमारत बांधण्याचे काम करण्यात येत आहे. या इमारतीच्या भूखंडाचे क्षेत्र ८.६५ एकर (३७२३२.२५ चौ.मी.) एकूण बांधकाम क्षेत्र-९१४५९ चौ.मी. (सुमारे १० लाख चौ. फूट) असणार आहे. तर नविन प्रशासकीय इमारतीमध्ये पुढील प्रमाणे ४ विंग बांधण्यात येणार आहेत.

### 300 नगरसेवकांना बसण्यासाठी आसन व्यवस्था

» महापालिकेची चिंचवड स्टेशन या ठिकाणी ३५ एकर जागा आहे. त्यापैकी ८.६५ एकर जागेत १३ मजली प्रशस्त पर्यावरणपूरक इमारत उभारण्याचे नियोजन आहे. भविष्यातील ५० वर्षांचे नियोजन करून या इमारतीचा आराखडा तयार करण्यात आला. महापालिकेच्या विविध विभागासह पदाधिकाऱ्यांची दालने असतील. प्रशस्त सभागृह, मीटिंग हॉल, कॅण्टीन, स्वच्छतागृह आणि इतर सोयी असणार आहे. उर्वरित जागेत सिटी सेंटर उभारण्यात येणार आहे. पाच मजली स्वतंत्र इमारतीमध्ये वाहनतळ असणार आहे. त्यात ५०० मोटारी आणि दीड हजार दुचाकी पार्क करता येणार आहेत. तर, महापालिका सभागृहात ३०० नगरसेवकांना बसण्यासाठी आसन व्यवस्था असणार आहे. इमारतीच्या गच्चीवर हेलिपॅड असणार आहे.

> सद्यस्थितीत २० टक्के काम पूर्ण झाले असुन इमारतीचे संपुर्ण खोदकाम व फाऊंडेशनचे काम पुर्ण झालेले असून आता सर्वात खालील तळघराच्या स्लॅबचे काम प्रगतीपथावर आहे. स्लॅबवरील कॉलमचे काम पावसाळ्यात करणे शक्य होणार आहे. मुदतीमध्ये काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
>
> **- प्रमोद ओंभासे, सह-शहर अभियंता, महापालिका.**

# शहरात 1 हजार 'अनफिट' वाहने रस्त्यांवर

## वाहनांचा फिटनेस, चालकांचे परवाने, इतर नियामक विषयांचीही तपासणी : आरटीओची पथके सक्रिय

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालय अंतर्गत सद्यस्थितीत २ हजार ९५१ स्कूल बस धावतात. त्याबाबतची माहिती आरटीओच्या वतीने घेण्यात आली आहे. या बस शालेय विद्यार्थी घेऊन धावणार असल्याने त्या फिट आहेत का, रस्त्यांवर धावण्यापूर्वी आवश्यक तपासणी पूर्ण केली आहे का, याबाबत आरटीओचे वायुवेग पथक तपासणीसाठी तैनात असणार आहे. जूनच्या दुसऱ्या आठवड्यात सीबीएसईच्या शाळा नुकत्याच सुरू झाल्या आहेत, तर राज्य शिक्षण मंडळाच्या शाळाही सुरू झाल्या आहेत. शाळेत विद्यार्थ्यांची ने-आण करण्यासाठी स्कूलबसही सज्ज झाल्या आहेत. स्कूलबस वाहनमालक व चालकांना आरटीओने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे. दरम्यान जवळपास एक हजाराहून अधिक बसचालकांकडे फिटनेस प्रमाणपत्र नाही, मात्र तरीही त्या रस्त्यांवर धावत आहेत.



पिंपरी-चिंचवड शहरातील बहुतांश शाळा जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून सुरू झाल्या आहेत. शालेय विद्यार्थ्यांना ने-आण करण्यासाठी शहरातील वेगवेगळ्या स्कूल बसेस, व्हॅन या रस्त्यावर दिसू लागलेल्या आहेत. दरम्यान या वाहनांनी योग्यता प्रमाणपत्रांची तपासणी केली आहे का, ते वाहन रस्त्यावर धावण्यास फीट आहे का, याबाबतची माहिती आरटीओकडून गोळा केली जात आहे. पिंपरी-चिंचवड उपप्रादेशिक वाहन निरीक्षक कार्यालयाच्या वतीने नियमावली तयार करण्यात आले आहे. नियम मोडणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले आहे.

वाहतूक करण्यासाठी शाळा प्रशासन व पालकांच्या वतीने खासगी स्कूल बसचालक, मालक यांच्यासोबत करार केला जातो. घरापासून शाळेपर्यंत विद्यार्थ्यांची नियमित वाहतूक करण्याची जबाबदारी स्कूल बसचालक, मालक यांची असते. या स्कूल बसचालक व मालकांकडून मोटार वाहन नियमांचे काटेकोर पालन होते की नाही, हे तपासण्याची मोहीम पिंपरी-चिंचवड प्रादेशिक वाहन निरीक्षक कार्यालयाकडून हाती घेण्यात आली आहे. शहरातील विविध ठिकाणी मोटार वाहन निरीक्षक अधिकाऱ्यांच्या पथकाकडून बसची पाहणी करण्यात येत आहे. रस्त्यात ठिकठिकाणी पथकांकडून स्कूल बसची तपासणी करण्यात येत आहे.

या वाहनांचा फिटनेस, चालकांचे परवाने, वाहनातील इतर नियामक विषयांची तपासणी मोटार वाहन निरीक्षकांकडून करण्यात येत आहे. चिखली तळवडे परिसरात आरटीओ अधिकाऱ्यांच्या पथकाकडून नुकतीच स्कूल बसची पाहणी करण्यात आली. आरटीओने घालून दिलेल्या नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनांवर रीतसर कारवाई करण्याची मोहीम संबंधित कार्यालयाकडून राबवण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. आरटीओच्या पथकांकडून ठिकठिकाणी रस्त्यात स्कूल बस पाहून अचानक पाहणी करण्यात येत आहे.

### अशी आहे आकडेवारी

» शहरातील एकूण बसेस २, ९५१
» योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण १९०३
» योग्यता प्रमाणपत्र संपलेली वाहनांची (स्कूल बस) संख्या १०४८

# ‘टोइंग’च्या सरसकट भुर्दंडातून सुटका

## कारवाईच्यावेळी वाहनचालक उपस्थित असल्यास केवळ ‘नो-पार्किंग’चा दंड



**पुणे | प्रतिनिधी**

वाहनचालक उपस्थित असताना ‘नो-पार्किंग’ किंवा ‘रॉंग पार्किंग’ची कारवाई केल्यास, त्याच्याकडून गाडी ओढून नेण्याचा (टोइंग) दंड आता घेता येणार नाही. नियमबाह्य पार्किंगवर कारवाई कशी करायची, याबाबत पुणाच्या पोलीस आयुक्तांनी मार्गदर्शक सूचनाच जारी केल्या असून, त्यामध्ये ही स्पष्टता आणली आहे.

बेशिस्तपणे वाहने लावणाऱ्या वाहनचालकांवर कारवाईसाठी ‘टोइंग व्हॅन’चा वापर करण्यात येतो. गाड्या ओढून नेण्याचे काम एका खासगी कंपनीला देण्यात आले आहे. प्रत्यक्ष कारवाई करताना ‘टोइंग व्हॅन’वरील कामगार वाहनचालकांशी अरेरावी करतात, अशा तक्रारी पोलीस आयुक्तांकडे करण्यात आल्या होत्या. त्यानंतर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी बुधवारी परिपत्रक जारी केले. पोलीस आयुक्तालयात टोइंग करणाऱ्या कंपनीचे प्रतिनिधी, कर्मचाऱ्यांची बैठक आयोजिण्यात आली होती. या बैठकीत पोलीस आयुक्तांनी मार्गदर्शक सूचना दिल्या.

या सूचनांनुसार, वाहन चुकीच्या ठिकाणी वा पद्धतीने लावल्याबद्दल होणाऱ्या कारवाईच्या वेळी वाहनचालक उपस्थित असल्यास त्याच्याकडून गाडी ओढून नेण्याचा (टोइंग व्हॅन) खर्च घेण्यात येऊ नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे. अनेक वाहनचालकांना सम-विषम दिनांक पद्धत माहिती नसते. काहीजण बाहेरगावाहून येतात. त्यामुळेही पार्किंगबाबत माहिती नसते. अशा वेळी वाहनचालक कारवाईच्या वेळी उपस्थित असूनदेखील चुकीच्या पद्धतीने गाडी लावण्यासाठी केलेल्या कारवाईबरोबरच टोइंग व्हॅनचा दंडही वाहनचालकाकडून आकारला जातो. आता याला आळा बसेल. शिवाय, सम-विषम दिनांक विचारात न घेता वाहन लावल्याचे आढळून आल्यास टोइंग व्हॅनमधील पोलीस कर्मचाऱ्यांनी याबाबतची घोषणा ध्वनीक्षेपकाद्वारे करावी, अशीही सूचना करण्यात आली आहे. पोलीस कर्मचाऱ्यांनी ई-चलन यंत्र आणि वॉकीटॉकी बाळगावी, असेही निर्देश या बैठकीत पोलीस आयुक्तांनी दिले.

### नो-पार्किंग दंड (टोईंग चार्जसह)

- वाहन प्रकार - दंड जीएसटीसह - टोईंग चार्ज - एकूण दंड
- दुचाकी - ५०० रुपये - २८५ रुपये - ७८५ रुपये
- चारचाकी - ५०० रुपये - ५७१ रुपये - १ हजार ७१ रुपये

# लष्कर वाहतूक विभागांतर्गत पार्किंग व्यवस्थेत बदल

## लष्कर वाहतूक विभागांतर्गत रस्त्यावरील पार्किंग व्यवस्थेतील बदलाबाबतचे तात्पुरते आदेश



**पुणे | प्रतिनिधी**

वाहतूक सुरक्षित व सुरळीतपणे सुरू राहण्याकरीता लष्कर वाहतूक विभागांतर्गत रस्त्यावरील पार्किंग व्यवस्थेतील बदलाबाबतचे तात्पुरते आदेश काढण्यात आले आहेत. या आदेशानुसार महात्मा गांधी रस्ता, कॅम्प येथील वाय जंक्शन ते ट्रायलक हॉटेल चौकापर्यंत रस्त्याच्या पूर्व तसेच पश्चिम दिशा नो पार्किंग, वाय जंक्शन ते १५ ऑगस्ट चौकापर्यंत रस्त्याच्या पूर्व बाजूस नो पार्किंग, रस्त्याच्या पश्चिम बाजूस सिरीयल माता मेढी मंदीर ते १७४, रेडीएंट स्पॉट व शॉप नं.१ पर्यंत दुचाकी पार्किंग, १७४, रेडीएंट स्पॉट, शॉप नंबर १ पासून पुढे १८२ व जय अम्बे मोटर्स या दुकानापर्यंत चारचाकी वाहनांसाठी अॅंग्युलर पार्कींग करण्यात आले आहे.

१५ ऑगस्ट चौक ते महमंद रफी चौकापर्यंत रस्त्याच्या पूर्व बाजुस १४०, महात्मा गांधी रस्त्यावरील हेमा फ्लोवर्स दुकान ते ९५, प्लेटेनियम लायटनिंग या दुकानापर्यंत तसेच रस्त्याच्या पश्चिम बाजूस १८५, चौधरी असोसिएटस, महात्मा गांधी रस्ता ते महमंद रफी चौक (एसबीआय,एटीएम) पर्यंत रस्त्याच्या दुतर्फा दुचाकी वाहनासाठी पार्किंग करण्यात येत आहे. महमंद रफी चौक (एसबीआय, एटीएम) ते कोहीनूर हॉटेल रस्त्याच्या पश्चिम बाजूस २४१, बिल्लीमोरीया कॉस्मेटिक अॅन्ड लेडीज टेलर, कॅम्प या शॉपपर्यंत तसेच पूर्वबाजूस ९३, शमुन्स फ्लॉवर्स, महात्मा गांधी रस्ता, कॅम्प ते ३७, महात्मा गांधी रस्ता, महावीर चौकाजवळील पूर्वबाजूचे बाटा शोरुमपर्यंत व कोहीनूर हॉटेल चौक ते महावीर चौकापर्यत पश्चिम बाजूस २४५/४६, महात्मा गांधी रस्त्यावरील प्रिया हॉटेल ते २८५, डीनोव्हो क्लोथ मार्टपर्यंत सम विषम तारखेस आलटून पालटुन एका बाजूस दुचाकी तर दुसऱ्या बाजुस अॅंग्युलर चारचाकी वाहनाचे पार्किंग करण्यात येत आहे.

महावीर चौक ते नाझ चौकापर्यंत पश्चिम बाजूस २९०, कॅन्टाबिल, महात्मा गांधी रस्त्यावरील ६, सारेगामा म्युझिकल शॉपपर्यंत तसेच पूर्व बाजूस ३१/३२, बैंक ऑफ बडोदा ते २७, आदिदास क्लोथ शॉप पर्यंत सम विषम तारखेस आलटून पालटुन एका बाजुस दुचाकी तर दुसऱ्या बाजुस चारचाकी वाहनासाठी अॅग्युलर पार्किंग करण्यात येत आहे. नाझ चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापर्यंत मोलेदिना रस्त्यावर रस्त्याच्या पश्चिम बाजूस शॉप नंबर ५, अलाईस इन जॅलेटो लॅन्ड, अरोरा टॉवर बिल्डिंग, कॅम्प ते शॉप नंबर ९ कराची स्वीट मार्ट, अरोरा टॉवर बिल्डिंग, कॅम्प पर्यंत तसेच पूर्व बाजूस शॉप नंबर ११, मॅजेस्टीक परफ्युम अँड अॅपरीयल्स स्टर्लिंग सेंटर बिल्डिंग, कॅम्प ते शॉप नंबर २, बगीचा कॉर्नर पर्यंत दुचाकी वाहनांसाठी पार्किंग करण्यात आले आहे.

### वानवडी, मुंढवा व कोरेगाव पार्कमध्ये पार्किंग बदल

वानवडी, मुंढवा व कोरेगाव पार्क वाहतूक विभागांतर्गत रस्त्यावरील पार्किंग व्यवस्थेतील बदल करण्यात आले आहेत. वानवडी वाहतूक विभागांतर्गत फातिमानगर चौक ते पंचरत्न सोसायटी सोलापूर पुणे रस्त्याची व हॉटेल तंदूर ते फातिमानगर चौक पुणे सोलापूर रस्त्याची बाजू ५० मीटर अंतर नो पार्किंग, नो हॉल्टींग करण्यात आले आहे. तसेच, अॅव्हेन्यु मॉलच्या मुख्य प्रवेशद्वारापासून उजव्या व डाव्या बाजूला ५० मीटर नो पार्किंग करण्यात आले आहे. मुंढवा वाहतूक विभागांतर्गत अनंत थिएटर पासून घोरपडी पोलीस चौकीकडे जाणारा रस्ता विश्वलक्ष्मी चौक ते अनंत कॅन्टीन जंक्शनपर्यंत ५०० मीटर पी १, पी २ पार्किंग करण्यात आले आहे. कोरेगाव पार्क वाहतूक विभागांतर्गत कोरेगाव पार्क लेन क्रमांक ७ रस्त्याच्या पूर्व बाजूस असणाऱ्या क्लोवर रॉयल सोसायटी प्रवेशद्वार (ए) ते क्लोवर पार्क व्यू सोसायटी प्रवेशद्वारापर्यंत एका बाजूला नो पार्किंग करण्यात आले आहे.